पुढारी

# 'रवळनाथ'च्या प्रधान कार्यालयात सौरऊर्जेचा वापर

गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा

येथील श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीच्या गडहिंग्लज प्रधान कार्यालयाचे संपूर्ण कामकाज आता सौरऊर्जेवर चालणार आहे. त्यासाठी सुमारे १२ लाखांची सोलर सिस्टीम यंत्रणा बसविण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे दरवर्षी तब्बल २ लाखांची बचत होणार आहे. रवळनाथने अपारंपरिक ऊर्जा व पैशाची बचत करण्यासाठी सौरऊर्जेचा वापर करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याची सुरुवात संस्थेच्या प्रधान कार्यालयातून करण्यात आली. येथील डॉक्टर्स कॉलनीतील संस्थेच्या प्रधान कार्यालयात बसविण्यात आलेल्या सौरऊर्जा प्रकल्पाचे उद्घाटन संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले यांच्या हस्ते झाले.

३१ पॅनेल्सच्या माध्यमातून एकूण १८.४ किलो वॅटमधून प्रतिदिनी ७० युनिट विजेची निर्मिती होईल.

## १२ लाखांचा प्रकल्प; दरवर्षी २ लाख वीज बिल वाचणार

कार्यालयाच्या गरजेपेक्षा अधिक होणारी वीज महावितरणला दिली जाणार असून प्रकल्पासाठी गुंतवलेली १२ लाख रुपये ६ वर्षांत वसूल होतील, असेही संस्थाध्यक्ष चौगुले यांनी स्पष्ट केले.

यावेळी उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव, संचालक प्राचार्य आर. एस. निळपणकर, प्रा. विजय आरबोळे, डॉ. संजय चौगुले, प्रा. डॉ. दत्ता पाटील, महेश मजती, रेखा पोतदार, मीना रिंगणे, सीईओ डी. के. मायदेव, व्यवस्थापक शिवानंद घुगरे, प्रशासन अधिकारी सागर माने, जनसंपर्क अधिकारी बाबासो मार्तंड, सर्नालिशचे अवधूत जोशी, जयंत हरळीकर आदींसह सभासद व कर्मचारी उपस्थित होते.